

# मी कॉलेजचा प्रिन्सिपल झालों तर–

कॉलेज विद्यार्थी लेखस्पर्धेतील
पहिल्या पारितोषिकाचा लेख



लेखक— प्रकाश वि. गोळे

***

"अे, नवीन नोटिस बघितलीस का? नवीन आल्याबरोबर लगेच नवीन खूळ निघालेलं दिसतंय् साहेबांच्या डोक्यांतून! आज दुपारीं बारा वाजतां आपला प्रिन्सिपलशी अिंटरव्ह्यू आहे!" प्री-डिग्रीच्या दोन विद्यार्थ्यांमधील तें संभाषण माझ्या कानीं पडलें.

अेकूण मीं लावलेल्या पहिल्याच नोटीशीचें स्वागत वाअीट झालें नव्हतें. आज कॉलेजचा दुसरा दिवस. मी कालच माझ्या जागेचा चार्ज घेतला होता. 'ऑफिशिअेटिंग' प्रिन्सिपल' म्हणून अेक वर्षभर केवढी जबाबदारी माझ्यावर येअून पडली होती. माझ्या कॉलेजांत आता मी काय करणार अन् काय नाही! गेल्या दोन रात्रीं अनेक शिक्षणतज्ज्ञांनी माझ्या डोक्यांत प्रचंड युद्धें खेळून माझ्या डोक्याचा निकाल लावला होता! अेवढ्या सागरमंथनांतून अेकेक रत्नें बाहेर न पडलीं तरच नवल! प्रचंड धाडस करून मीं कशीतरी माझी पहिली नोटिस क्लार्कजवळ दिली.

नवीन आलेल्या प्रिन्सिपलचा नवीनच येणाऱ्या मुलांशीं अेकदा तोंडी सामना घडून आला तर वाअीट नव्हतें. माझ्या बाजूने मीं जय्यत तयारी ठेवली होती. स्वतः मी, शिवाय आमच्या कॉलेजांतील वयोवृद्ध प्राचार्यवर्ग आणि आणखी अेक माणूस– तो म्हणजे गावांत नवीनच आलेला अेक प्रसिद्ध .मानसशास्त्रज्ञ. माझ्या खास विनंतीवरून त्यांनी मला मदत करण्याचें कबूल केलें होतें. मुलांशीं माझी ओळख व्हावी ही तर माझी अिच्छा होतीच,

शिवाय प्रत्येक विद्यार्थ्याच्या शालेय कारकीर्दी बाबत, त्याच्या आवडी-निवडीबाबत आणि त्याच्या भविष्यांतील योजनांसंबंधी त्यांच्याशीं थोडा वेळ समक्ष चर्चा व्हावी असेंहि वाटत होतें. प्रत्येक विषयांतील जाणते प्राध्यापक मीं त्या दृष्टीने सिद्ध ठेवले होते. त्या त्या विद्यार्थ्याने निवडलेल्या विषयासंबंधी त्याला थोडीफार माहिती व्हावी, त्याचप्रमाणे त्याला जर विषय बदलावयाचा असेल तर त्याहि बाबतींत मार्गदर्शन व्हावें असें मला वाटत होतें. प्रत्येक विद्यार्थ्याचें 'रेकॉर्ड' कॉलेज-जवळ राहावें हा हेतु होताच.

ह्या मुलाखतीच्या गडबडींत तीन दिवस अुडाले! ह्या अवधींत मीं आणखी दोन गोष्टी केल्या. पहिली म्हणजे कोणाचाच प्रवेश (ॲड्मिशन्) अजून कायम केला नव्हता. मुलांचे लोंढेच्या लोंढे कॉलेजवर चाल करून येत होते. ह्या पुराला कोठे बांध घालावा हेंच कळत नव्हतें. तरी बरें, मीं प्रवेश अगदी गुणानुक्रमें द्यायचें ठरविलें होतें. पण त्यामुळे माझें समाधान झालें नव्हतें. प्रवेश नाकारला गेल्यामुळे परत जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे गोरेमोरे चेहरे मला सारखा त्रास देत होते! शेजारी ते प्रसिद्ध तज्ज्ञ बसले होते, त्यांच्याकडे दृष्टि जातांच माझ्या डोक्यांत अेक कल्पना चमकली. त्यांच्याशीं झालेल्या वाटाघाटींत दोन तास निघून गेले. त्या अवधींत माझ्या मानसशास्त्राच्या ज्ञानांत ढिगाऱ्याअेवढीं भर पडली! त्यांनी बरोबर आणलेल्या अनेक कागदपत्रांचे सागर आम्ही तरून गेलों!

दुसऱ्याच दिवशीं कॉलेजमध्ये अेक नवीनच पाटी झळकली– 'विद्यार्थी-सल्लागार.' अजून आपण कॉलेजमध्ये नक्की झालों की नाही ह्या संभ्रमांत वावरणाऱ्या बिचाऱ्या विद्यार्थ्यांना आणखी अेका दिव्यांतून पार पडावें लागणार हें अुघड झालें. ह्या 'विद्यार्थी सल्लागारां' समोर त्यांना कांही चाचण्या द्याव्या लागणार होत्या. त्यावरून त्यांची योग्यता त्यांना सांगितली जाणार होती. अमुक अेक विद्यार्थी महाविद्यालयांत शिक्षण घेण्यास लायक आहे की नाही हे त्यावरून ठरणार होतें. त्याचप्रमाणे त्याने कला किंवा शास्त्र ह्यांपैकी कोठला मार्ग धरावा ह्या बाबतींतहि त्याला सल्ला दिला जाणार होता. अर्थात् तोच रस्ता 'त्याने पकडावा अशी सक्ती नव्हती. ह्या चाचण्यांमुळे विद्यार्थ्याची सर्वांगीण पाहणी, त्याचें व्यक्तिमत्त्व, याचें सामान्य ज्ञान, त्याचें शील व त्याच्या मनाची सर्वसाधारण घडण यांबाबत माहित्ती मिळविली जाणार होती. त्याचा अुपयोग करून त्याला योग्य सल्ला दिला जाणार होता ह्या खात्याने शिफारस केलेल्यांनाच प्रवेश द्यावा अशी माझी योजना होती. विद्यार्थ्याने आतापर्यंत शैक्षणिक क्षेत्रांत दाखविलेल्या कर्तबगारीचा विचार तर प्रामुख्याने होणार होताच; पण बहिःशाल कर्तृत्वालासुद्धा योग्य ती किंमत दिली जाणार होती.

हा कार्यक्रम पार पडला तेव्हा मी सुटकेचा निःश्वास टाकला. विद्यार्थ्यांची अेकुण संख्या आता निश्चित झाली होती. मी प्रथमपासूनच असें ठरवून टाकलें होतें, की अेका तुकडींत चाळीसपेक्षा जास्त


आनंदी आणि
खेळकर वृत्तीच्या तरुणीसाठीं

*तिच्या कांतीची निगा राखणाऱ्या दोन वस्तू म्हणजे—*




दिवसभराचा शीण घालवून त्वचेला टवटवी प्राप्त करून देणारा ओ-द-कोलन साबण

आणि, मन प्रसन्न करणारें शीतल व सुवासिक ओ-द-कोलन

टाटांचें
ओ-द-कोलन व ओ-द-कोलन साबण

दि टाटा ऑइल मिल्स कंपनी लिमिटेड



TE 7145

# बालशकुन्तला



★ *नामवंत कवींच्या ताज्या ताज्या कविता वाचण्यांत मौज असते. परंतु, त्यापेक्षाहि कांही और मौज याच कवींच्या त्यांच्या तारुण्याच्या काळांतील कविता वाचण्यांतहि असते.*

*अशी गोडी तुम्हीं पूर्वी कधी चाखली आहे काय ? महाराष्ट्राचे ख्यातनाम कवि प्रा. अनंत काणेकर यांनी वयाच्या १७ व्या वर्षी ( १९२२ सालीं ) लिहिलेली ही कविता तुम्ही जरूर वाचून पाहा!*

( साकी )

पोर पोरकी कण्वमुनींना सापडली रानांत;
आश्रमिं आणुनि मुनिंनी तिजला वाढविली प्रेमांत.

सर्व जरी सोडिला तयांनी मायामोहपसारा,
अेकवटे परि जीव मुनींचा शकुन्तलेवरि सारा.

वनदेवींनी जोजविलें तिज गाअुनिया अंगाअी;
निसर्गदेवी लालन करिते होअुनि तिजला आअी.

नव्हतें कोणी शिकवाया तिज वनीं गावया गीत;
प्रेमळ निर्झर शिकवी तिजला निज झुळुझुळु संगीत !

झुळझुळत्या निर्झरतीरावर बसुनी गावीं गाणीं,
फुलवेलींतुनि साथ धरावी तिजला खगबालांनी !

लसलशीत हिरवाळीमध्ये घेअुनि हरिणी जावें,
बागडुनी स्वच्छंद तिजसवें नाना खेळ करावे.

वृक्षांवरुनी लोंबति खाली विलोल हिरव्या वेली,
झोके घ्यावे त्यांवर बसुनी प्रशांत सायंकालीं.

फुलांचीच करि कर्णभूषणें कंकणेंहि कुसुमांचीं;
मृणालगुंफित माळ रुळतेस गळ्यांत वनपुष्पांची.

सुमनांचे शृंगार घालुनी आश्रमिं येअी सजुनी,
हसुनि विनोदें मुनिवर म्हणती ‘ यत बघा वनराणी !’

प्रियंवदेसह जावें केव्हा रानिवनीं फिरण्यास;
लतातरूंशीं पांखरांसवें करण्या गुजगोष्टींस !

फिरतांफिरतां हासतखेळत तरुवल्लींतुनि बाला,
तरुवरि झुकली लता पाहुनी हळुच म्हणे स्वसखीला–

‘ आम्रतरूला कशी बिलगली पाहि गडे, लतिका ही !
लाजुनि, वेडे, कां थरथरशी अैशी लतिकाबाअी ?’

मुखकमलावरि लुब्ध होअुनी मधुकर घिरटया घाली,
अलिगुंजितसंत्रस्ता बाला प्रियंवदेला वदली–

‘ भृंग गडे, बघ तोंडाभवती कसा घिरट्या घेतो,
चावट कुठला ! फारच बाअी, मजला पीडा देतो !’

कधी बिलगुनी मुनिहृदयाशीं सांगावीं गाऱ्हाणीं,
‘ ऋषिकुमार हे ओढुनि घेती हातांतुनि मम हरिणीं !

पाहत असतां नवलाने मी कुवलयनील नभांत,
डोळे मिचकावुनी मला हे तारागण हसतात !’

‘ ठाअुक माझी शकुन्त मजला फार शहाणी बाळी !’
बोलुनि अैसें, मुनिवर तिजला प्रेमाने कुरवाळी.

मधुर बोलणें, मधुर हासणें, सर्वंचि अति निर्व्याज;
कण्वमुनींची फार लाडकी सर्व पुरविती चोज.

कोमल फुलत्या फुलवंतीची चेतोहर सुंदरता,
जलवंतीच्या जललहरींची मोहक अुच्छृंखलता,

तशीच हसऱ्या बालझऱ्याची हृदयंगम बालिशता,
वनमालेच्या सुंदर देहीं पावति पूर्णोत्कटता.

निसर्गांत वाढली, खेळली निसर्गांतची बाला;
कितीक वर्णूं शकुंन्तलेच्या निसर्गसरलत्वाला !

*–अनंत काणेकर*

---

विद्यार्थ्यांस प्रवेश द्यावयाचा नाही. मी निर्माण केलेल्या विद्यार्थी-सल्लागाराने माझा प्रश्न पुष्कळसा सोपा केला होता यांत शंका नाही ! आता माझ्या कल्पनेप्रमाणे आमच्या कॉलेजांत अेका विशिष्ट श्रेणीचे विद्यार्थी अुरले होते. त्यांच्याकडे वैयक्तिक रीत्या लक्ष देणें सुलभ जाणार होतें. प्रत्येक विद्यार्थ्याचें माहितीपत्रक ( रेकॉर्ड ) आतापर्यंत तयार झालें होते. अेवढी तयारी झाल्यावर मी पुढचें पाअूल अुचललें.

प्रत्येक तुकडीवर अेका प्राध्यापकाची नेमणूक करून त्याच्या हातांत त्या तुकडींतील विद्यार्थ्यांची माहितीपत्रकें व हजेरी-पत्रक सोपविलें. साधारणपणें प्रत्येक ‘ वर्ग-प्राध्यापक ’ त्या त्या वर्गाला अेखादा विषय शिकविणारा असेल अशी दक्षता मीं घेतली होती. शाळांतून जसे वर्गशिक्षक असतात, त्या चालीवर ‘ वर्ग-प्राध्यापकां ’ची मीं नेमणूक केली. सध्याचें महाविद्यालयीन शिक्षण महाग आहे याबाबत दुमत नाही; पण महर्गतेबरोबरच दर्जाहि शक्य तितका अुच्च ठेवला पाहिजे आणि त्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याकडे जितकें लक्ष देतां येअील तितकें चांगलें, या दृष्टीने कॉलेजमधील व्याख्यानांची पद्धति बदलावी व शिकवण्याच्या पद्धतींतहि बदल करावा असें मला वाटत होतें. कॉलेजमध्ये अेका विशिष्ट श्रेणीच्या मुलानांच प्रवेश मिळाला पाहिजे हा माझा कटाक्ष होता. अशा गुणी मुलांना कॉलेजने शक्य तितक्या अुत्कृष्ट रीतीने मार्गदर्शन व मदत केली पाहिजे, असें मला वाटत होतें.

कॉलेजमधील शिकविण्याच्या पद्धतीचा विचार करण्यासाठी, माझ्या सर्व सहकाऱ्यांना माझ्या कांही कल्पना समजावून सांगण्यासाठी व त्यावरील त्यांचीं मतें व

अभिप्राय जाणून घेण्याच्या अुद्देशाने मला अेक सभा बोलावणें अिष्ट वाटलें. त्या सभेंत चालू वर्षी अभ्यासक्रम कोठल्या तत्त्वांना धरून असावा याबाबत कांही योजना आखण्यांत आल्या. प्री-डिग्रीचीं दोन वर्षें व अिंटरच्या परीक्षेनंतरचीं दोन वर्षें अशी विभागणी करण्यांत येअून ह्या दोन्ही विभागांसाठी निराळीं धोरणें आखण्यांत आलीं. त्याचप्रमाणे सर्वांची सोय पाहून तासांचें वेळापत्रक ठरविण्यांत आलें.

कॉलेजमधील पहिल्या वर्षीचे विद्यार्थी कॉलेजच्या वातावरणांत चटकन् समरस होअून जाणें शक्य नसतें. व्याख्यानांद्वारें शिकविण्याची पद्धत तर त्यांस सर्वस्वी नवीन असते. अर्थात् त्यांच्या सोयीने त्या पद्धतींत बदल करणें प्राप्त होतें. सध्याच्या पद्धतींतच दोन ढोबळ विभाग पाडण्यांत आले. प्रत्येक प्राध्यापकाने आपल्या आठवड्यांतील वेळापत्रकाचे दोन भाग पाडावेत असें सुचविण्यांत आलें. कांही तास हल्लीप्रमाणेच व्याख्यानांकरिता ठेवावेत व कांही तासांना तोच विषय परीक्षेच्या दृष्टीने सोयिस्कर विभाग पाडून शिकवावा. सध्याची ट्युटोरिअल्-पद्धति ह्या दृष्टीने अुपयुक्त ठरेल. मात्र विद्यार्थ्यांस केवळ प्रश्न घरून लिहून आणावयास न सांगतां प्रत्येक प्रश्न तासाला पूर्णपणें समजावून द्यावा. तो मुद्देसूद रीतीने कसा लिहावा ह्याचें विवेचन करावें व नंतर तो याजकडून लिहवून घ्यावा. ह्याच वेळांत मुलांच्या अडचणीहि सोडवाव्यात.

ह्या पद्धतीमुळे अूठसूट मार्गदर्शकाची ( गाअिड ) मदत घेणें व शिकवणीचे वर्ग धरणें ही पद्धत कमी होअील, परीक्षेंतील अुत्तरपत्रिकांचा दर्जा सुधारेल व प्राध्यापकांबद्दल विद्यार्थ्यांच्या मनांत विश्वास अुत्पन्न होअील, असे आम्हांस वाटलें.

मातृभाषा हेंच माध्यम निदान ह्या तासांपुरतें अुपयोगांत आणल्यास फायदा होअील. मात्र अिंग्रजी भाषेचा संबंध सोडणें अिष्ट होणार नाही. व्याख्यानें अिंग्रजींतून व्हावींत. तीं विषयाचा सखोल व सांगोपांग परिचय विद्यार्थ्यांस होअील अशा रीतीने घेण्यांत यावींत असें आम्हीं ठरविलें. अिंग्रजी हा विषय पदवी-परीक्षेपर्यंत सक्तीचा आहे. त्याकरिता पहिल्या दोन वर्षांत अिंग्रजीची भक्कम तयारी करून घ्यावी असेंहि ठरविण्यांत आलें. विशेषतः विद्यार्थ्यांस अिंग्रजी अुत्तम तऱ्हेने लिहितां येअील ह्याकडे लक्ष पुरवावें असें सर्वांचें मत पडलें. प्रत्येक विषयावर महिन्यांतून कमींत कमी दोन तरी प्रश्न मुलांकडून लिहून घ्यावे; म्हणजे तिमाही, सहामाही वगैरे परीक्षांची जरूरी राहणार नाही. वार्षिक परीक्षासुद्धा केव्हा घ्यावी हें त्या त्या विषयांचें प्राध्यापक आपल्या वर्गांतील मुलांची तयारी पाहून ठरवतील व प्रत्येक विषयाची परीक्षा अशा रीतीने वेगवेगळी घेतली जाअील, केवळ वार्षिक परीक्षेलाच महत्त्व न देतां विद्यार्थ्याने संपूर्ण वर्षांत दाखविलेल्या तयारीचा निकाल लावतांना विचार केला जावा, असा अेकंदर रोख दर्शविण्यांत आला.

शेवटच्या दोन वर्षांकरिता मात्र चालू पद्धतींत महत्त्वाचे बदल घडवून आणावेत असें आम्हीं ठरविलें. पहिल्या दोन वर्षांत विद्यार्थ्यांकडून पुढील दोन वर्षांच्या अभ्यासक्रमाची पूर्वतयारी करून घ्यावी अशा हेतूने आम्हीं कार्यक्रमाची आखणी केली होती. माझ्या मतें शेवटच्या दोन वर्षांत कोठलाच विषय सक्तीचा ठेवला जाअूं नये. कोठलेहि विषय विद्यार्थ्याला निवडण्याची मुभा असावी. त्याचप्रमाणे ढोबळपणें अिंग्लिश, अितिहास, गणित असे विषय न ठेवतां, अिंग्लिश विषय निवडणाऱ्यांना त्यांतील कांही शाखांचा अभ्यास सखोल करण्याची संधि मिळावी. अुदाहरणार्थ, अिंग्लिश असा विषय न ठेवतां 'शेक्सपीयर,' 'प्राचीन अिंग्लिश गद्य', 'अर्वाचीन अिंग्लिश पद्य' असे विषय ठेवावेत. ही सूचना अर्थातच विद्यापीठाकडे विचारार्थ पाठविण्याचें ठरलें.

*☆ वैकुंठप्राप्तीच्या अिच्छेसाठी माणूस जेवढे प्रयत्न करतो त्याच्या निम्मे प्रयत्न जरी त्याने दुसऱ्याचें मन जाणून घेण्यासाठी केले तरी खरोखरच त्याला स्वर्गप्राप्ति होअील !*

प्रथम व द्वितीय वर्षांच्या वर्गाप्रमाणेच वरच्या वर्गांतहि तीसपेक्षा जास्त विद्यार्थी नसावेत असें आम्हीं ठरविलें. शिकविण्याच्या पद्धतींत व परीक्षा-पद्धतींत बदल करण्याची आवश्यकता सर्वांसच पटली. त्या दृष्टीने आम्हीं पुढील योजना अमलांत आणण्याचें ठरविलें. वर्गाचें स्वरूप अेखाद्या सभेसारखें (फोरम्) असावें. प्राध्यापक आठवड्यांतून कांही तास व्याख्यानासाठी राखून ठेवून अितर तासांना विद्यार्थ्यांशीं चर्चा करतील. विद्यार्थ्यांनी जे काय प्रश्न लिहिले असतील किंवा त्यांना ज्या अडचणी येत असतील त्यांचा विचार वर्गांत केला जाअील. व्याख्यानांत विषयाचा अभ्यास योग्य दिशेने कसा करावा याबाबत त्यांना सल्ला दिला जाअील व विषयाचें अधिक ज्ञान होण्याच्या दृष्टीने त्यांना मदत केली जाअील. निरनिराळ्या लेखकांशीं व त्या विषयांवरील सर्वोत्तम व अद्ययावत् वाङ्मयाशीं त्यांचा परिचय करून दिला जाअील. प्रत्येक विद्यार्थ्याच्या सिद्धतेची नोंद ठेवली जाअील. त्यावरून विद्यार्थ्यास पदवी-परीक्षेस बसण्यास परवानगी द्यावी की नाही हें ठरविलें जाअील. पदवी-परीक्षेच्या आधी अेक पूर्वतयारी-परीक्षा असणें आवश्यक आहे. पदवी-पूर्व वर्षाची (ज्यूनिअर) परीक्षा कॉलेज घेअील व ती परीक्षा केव्हा घ्यावी हें विद्यार्थी व प्राध्यापक मिळून ठरवितील.

सध्याची ट्युटोरिअल पद्धति वरील पद्धतींत अंतर्भूत आहेच. पण वरील पद्धतीला पूरक अशी अेक स्वतंत्र पद्धत आपल्या कॉलेजमध्ये चालू करावी असें आम्हीं ठरविलें. प्रत्येक विषयाकरिता अेक अभ्यासमंडळ असावें व कॉलेजमधील कोठल्याहि विद्यार्थ्यास त्याचे सभासद होतां यावें. त्या त्या विषयाचा प्रमुख (हेड ऑफ डिपार्टमेंट) त्या त्या मंडळाचा अध्यक्ष असावा. अेक विद्यार्थी अनेक मंडळांचा सभासद असूं शकेल. सभासदत्व अैच्छिक राहील. मात्र प्रत्येक सभासदाला मंडळाच्या कार्यक्रमांत क्रियाशील भाग घ्यावा लागेल. शेवटच्या दोन वर्षांकरिता कॉलेजमधील तासांची संख्या आम्हीं कमी केलीच होती. तेव्हा राहिलेल्या वेळांत ही मंडळें काम करतील. अिंटरपूर्व विद्यार्थ्यांनासुद्धा ह्या मंडळांचा लाभ घेतां येअील. कॉलेजमध्ये व कॉलेजच्या बाहेरहि हीं मंडळें काम करतील.

परीक्षेकरिता नेमून दिलेल्या अभ्यासक्रमापलीकडे विद्यार्थ्याला त्या त्या विषयाचें ज्ञान व्हावें, त्याच्या मनाचीं क्षितिजें विस्तारावींत, शक्य तर त्याला संशोधनाची आवड व माहिती व्हावी अिकडे ह्या मंडळांचें लक्ष राहील. बाह्य जगाशीं संबंध ठेवून ज्ञान मिळविण्यावर तीं भर देतील. निरनिराळ्या तज्ज्ञांचीं व्याख्यानें, परिसंवाद हेंहि क्षेत्र त्यांना खुलें आहेच. प्रत्येक मंडळावर अध्यक्षांस मदत करण्यासाठी

अेकेक विद्यार्थी–प्रतिनिधि निवडला जाअीलच. आणखी अेका दिशेने मंडळें अुपयुक्त टरतील. ह्या मंडळांच्या द्वारें आंतरमहाविद्यालयीन संबंध प्रस्थापित होअूं शकतील. निरनिराळ्या कॉलेजांमधील विद्यार्थ्यांबरोबर व प्राध्यापकांबरोबर चर्चा करून ज्ञानांत भर घालतां येअील. भिन्न प्रकारच्या विद्यार्थ्यांत मैत्रीचे संबंध प्रस्थापित होअून अधिक समजूतदारपणाचें वातावरण निर्माण होअील. माजी विद्यार्थीहि ह्या मंडळांना सहाय्य करूं शकतील. प्रत्येक कॉलेजमध्ये अशीं मंडळें असावींत अशी सूचना विद्यापीठाकडे पाठविण्यासहि आम्ही चुकलों नाही.

आपण कांहीतरी नवीन प्रयोग करीत आहोंत याच खुशींत मी गुंग होतों. तोंच त्या दिवशीं आमच्या जिमखान्याचे चेअरमन माझ्यापुढे दत्त म्हणून अुभे राहिले! कॉलेज सुरू होअूनच १५–२० दिवस झाले होते; जिमखाना-चिटणिसांच्या निवडणुकी घ्यायलाच पाहिजे होत्या. वक्तृत्व-मंडळ, कला-मंडळ हीं अितर मंडळें; नवीन सुरू केलेल्या अभ्यास-मंडळांवर नेमावयाचे विद्यार्थी-प्रतिनिधि; सायन्स असोसिअेशन, वाङ्मय-मंडळ ह्यांचे चिटणीस– अशा कितीतरी नेमणुका अन् निवडणुका व्हावयास पाहिजे होत्या. त्यामुळे माझ्या अुत्साहाला आवाहन करीत आणखी अेक क्षेत्र माझ्यापुढे खुलें झालें होतें! चेअरमन्साहेबांना 'आपण अुद्या पुन्हा विचार करूं' म्हणून वाटेस लावून मी पुन्हा डोकें खाजवीत बसलों. डोक्यांत आलें तें मीं अुतरवून काढलें.

"अेकच जिमखाना कां असावा? माझ्या मतें प्रत्येक वर्षाकरिता अेकेक स्वतंत्र जिमखान्यासारखी यंत्रणा आपण ठेवावी!" दुसऱ्या दिवशीं चेअरमनमहाशयांसमोर मी माझे विचार मांडीत होतों, "सध्या आपण जिमखाना–फी घेतोंच ना? त्याचे दोन भाग करून अेक चतुर्थांश भाग मध्यवर्ति जिमखान्याकडे ठेवावा व तीनचतुर्थांश त्या त्या वर्षाच्या जिमखान्यांना द्यावा. क्रिकेट, बास्केटबॉल, व्हॉलीबॉल अित्यादि विदेशी खेळांचे व हुतुतू, आट्यापाट्या, खोखो वगैरे देशी खेळांचे असे वर्षवार संघ ह्या जिमखान्यांकरवीं तयार करावे. त्यांचे आंतरवर्षीय सामने घ्यावे. कॉलेजचा संघ त्यांच्यांतून निवडावा. फायदा असा होअील, की हल्लीपेक्षा पुष्कळच जास्त विद्यार्थ्यांना खेळांचा लाभ घेतां येअील. खेळ सध्याप्रमाणे







# ब्रुक बाँड चहाची

## कोणत्याहि वेळेस मजा लुटा

ब्रुक बाँड इंडिया प्रायव्हेट लिमिटेड




BB 270 TR

वर्षांतील कांही अेका काळापुरतें मर्यादित राहणार नाहीत. हे संघ आपापसांत दिवस ठरवून घेअून, सराव करण्यासाठी कॉलेजच्या मैदानाचा अुपयोग करतील. निवडणुकांमध्येहि जास्तींत जास्त मुलांना भाग घेण्यास मिळून कॉलेजचें काम पार पाडण्याची सवय लागेल. बॅडमिंटन्, टेनिस, टेबल-टेनिस वगैरे वैयक्तिक खेळांसाठीहि कॉलेजचीं प्रांगणें, टेबलें वापरण्याकरिता प्रत्येक वर्षाकरिता दिवस नेमून देण्यांत येतील. वाटल्यास त्यासाठी मामुली आकार विद्यार्थ्यांस द्यावा लागेल. फुटबॉल, हॉकी अशा खेळांसाठी मात्र कॉलेजचा असा अेकच संघ राहील. कारण त्यांना संपूर्ण मैदान लागतें.

मैदानी खेळांसाठी अशीच व्यवस्था ठेवावी. वर्षांतून दोनदा आंतरवर्षीय चढाओढी घ्याव्या. त्यांतून आंतरमहाविद्यालयीन सामन्यांसाठी प्रतिनिधि निवडावेत. खेळांचें पद्धतशीर शिक्षण देण्यासाठी तज्ज्ञ शिक्षकांची नेमणूक करून त्यांच्याकडे निरनिराळ्या संघांना शिक्षण देण्याचें काम सोपवावें."

"क्रीडाक्षेत्रावरून आपण चढाओढीकडे वळूं," माझ्या तोंडच्या पट्ट्याला आता अगदी धरबंध राहिला नव्हता. नवनवीन क्षेत्रें माझ्या मनःश्चक्षूंसमोर अुलगडत होतीं आणि अेखाद्या दिग्विजयी योद्ध्याप्रमाणे मी तीं पादाक्रांत करीत चाललों होतों. "मला वाटतें, प्रत्येक टर्ममध्ये आपण निरनिराळ्या चढाओढी घ्याव्यात. अुदाहरणार्थ, वक्तृत्व, मैदानी व अितर खेळ, निबंध-लेखन, कथा-काव्य-नाट्य वगैरे ललितलेखन, वर्षवार नियतकालिकें काढणें वगैरे!"

"हो! नि आपलें सहल-खातें राहिलेंच की! वर्षवार निघणाऱ्या सहलींना मी विशेष महत्त्व देतों. प्रत्येक टर्ममध्ये अशी अेकेक सहल निघावी. त्याशिवाय दिवाळी, नाताळ, अुन्हाळ्याची सुटी अशा मोठ्या सुट्यांमधून संपूर्ण कॉलेजच्या अशा सहली निघाव्यात. सहलींचें अुद्दिष्ट मुख्यतः शैक्षणिक असावें. म्हणजे पुष्कळशा मुलांना कोठल्या ना कोठल्या तरी सहलींत भाग घेतां येअील. परस्परसंबंध वाढतील आणि प्रवासापासून होणारे फायदे निराळेच." मी मध्येच थांबलों. अेवढ्या भडिमाराने हे आता पुरते नामोहरम होअून हळूच माझ्या हातांत राजीनामा सरकविणार की काय अशी मला भीति वाटली. पण मीं थांबतांच त्यांचा चेहरा अुजळला.

त्यांना कांहीतरी बोलायचें होतें. शेवटीं ते हळूच म्हणाले, "आपण संमेलनाच्या बाबतींत अशीच व्यवस्था केली तर?" आता त्यांना टाळी द्यावी असें मला वाटलें. हा महत्त्वाचा कार्यक्रम तर माझ्या डोक्यांतून पार निसटला होता. "हो, हो!" मी आनंदून म्हणालों, "प्रत्येक वर्षाचें वेगळें स्नेहसंमेलन घ्यावें. त्याकरिता अेकेक वेगळा सेक्रेटरी आणि अेक प्राध्यापक नेमावे. वर्षभर त्या दृष्टीने त्यांनी जमवाजमव आणि तयारी करावी. म्हणजे अेकदम धांदल होणार नाही. ह्या संमेलनांतून अुत्कृष्ट ठरलेले निवडक कार्यक्रम नंतर सबंध कॉलेजच्या संमेलनांत व्हावेत. ह्या संमेलनाचें स्वरूप हे कार्यक्रम आणि अेका नामवंत व्यक्तीचें भाषण अेवढ्यापुरतेंच मर्यादित राहावें."

चेअरमनमहाशयांचें डोकें आतापर्यंत योजनांनी, कल्पनांनी आणि करामतींनी ठासून भरलें असावें. माझा निरोप घेअून ते बाहेर पडले ते मोठ्या घाअीगर्दीने. त्यांच्या चेहऱ्यावरून त्यांना स्फुरण चढल्यासारखें मला वाटलें. आपण आता जारीने अुद्योगाला लागलें पाहिजे हा भाव त्यांच्या चेहऱ्यावर मला दिसून आला. असे अुत्साही सहकारी मिळाल्याबद्दल मी स्वतःला धन्य समजलों. बस्! डोक्याला आता पुरा शीण आला होता. पाय मात्र बसूनबसून अवघडले होते. विचारांची वाटचाल खूप झाली होती; पायांना मात्र त्याची आवश्यकता होती. शेवटीं मी ऑफिसमधून बाहेर पडलों. अिमारतींत अेकदा फेरफटका करून यावें असा विचार आला. ह्या दगडी अिमारतीने माझ्या हृदयांत केव्हाच जिव्हाळा अुत्पन्न केला होता. पावलापावलागणिक माझ्या अंगावर कसल्यातरी अस्फुट भावनेमुळे रोमांच अुठत होते. पाय चालत होते, पण डोळे कोठेतरी दूर खिळले होते आणि मन समाधानाच्या मखमली हिरवळीवर पहुडलें होतें.

पण अेका ठिकाणीं पाय आपोआप थबकले! त्या हॉलमधील निस्तब्ध व गंभीर वातावरणाने माझें लक्ष चट्कन् वेधून घेतलें. बाहेरील 'वाचनालय व अभ्यासिका' ह्या नांवाचें कौतुक करीत मी आंत शिरलों. माझ्या आंत शिरण्याने जरा वातावरणांत थोडी चलबिचल झाली. वाचनालयाचे अधिकारी चट्कन् अुभे राहिले. त्यांच्या हातांत कसली तरी सूचना


रक्त व बलवर्धक असें अनुभवसिद्ध शुद्ध आयुर्वेदीय औषध

**सेल्टोन**

ट्रू प्रॉडक्ट्स्,
३०५ कॅडॉक टाअुन, नागपूर (१)

**विवाहेच्छु स्थळें –**

(१) प्रथमवर, M. B. B. S., वय ३०, देशस्थ ऋग्वेदी ब्राम्हण, मासिक प्राप्ति रु. ४००, वास्तव्य मुंबअी.

(२) प्रथमवर, H. M D. वय ४०, कऱ्हाडा ब्राम्हण, मासिक प्राप्ति ५०० रु., वास्तव्य मुंबअी.

(३) विनापत्य विधवा, पदवीधर, वय ३०, कोकणस्थ ब्राम्हण, सुस्वरूप, कुलीन, सरकारी नोकरी. पोस्टेजसह लिहा.

**सौ. शीला मंडपे**, ६९, लतीफ बिल्डिंग,
व्हिन्सेंट रोड, दादर, मुंबअी नं. १४.


**वधू पाहिजे**

प्रथमवर, सारस्वत ब्राम्हण, वय ३८, मॅट्रिक, स्वतंत्र व्यवसाय, मासिक प्राप्ति २५० रु. वास्तव्य मुंबअी. अपेक्षित वधू– सुशिक्षित, स्वावलंबी, महाराष्ट्रियन.

बॉक्स २७, किर्लोस्कर मासिक.
किर्लोस्करवाडी (सातारा)

**वधू-वर स्थळें**

डॉक्टर्स, अेंजिनियर्स, ऑफिसर्स, श्रीमंत व्यापारी, कारखानदार अित्यादींचीं ब्राम्हण, ब्राम्हणेतर भरपूर स्थळें आहेत. फक्त ग्रॅज्युअेट प्रथम वरांची नोंद विनामूल्य केली जाते. माहितीपत्रकासाठी तीस नव्या पैशांच्या पोस्टेजसह सविस्तर लिहा अगर सायंकाळीं भेटा. **सौ. आशाताअी कुलकर्णी, हेमराज ब्लॉक्स् टेंबे विश्रांतिगृहाच्या वर, ३१६ अे, गिरगांव रोड, ठाकुरद्वार, मुंबअी २.**



होती. ‘ ज्या विद्यार्थ्यांना पुस्तकें घरीं न्यावयाचीं असतील त्यांनी अनामत रक्कम वीस रुपये ठेवून या सवलतीचा फायदा घेतां येईल.’

झालें ! पुन्हा डोक्यांत विचारचक्र सुरू झालें. मी त्यांना म्हणालों, “ आपण अेक वर्ष डिपॉझिट न घेण्याचा प्रयोग करून पाहिला तर ? विद्यार्थ्यांवर आपण अेवढा विश्वास टाकावा. शिवाय अेवढे वीस रुपये सर्वांना देणें परवडणार नाही. त्याअैवजी आपण मुलांना कूपन्स द्यावींत व त्याच्या बदलीं पुस्तकें न्यावयास परवानगी द्यावी. जर पुस्तकें हरवलीं किंवा नुकसानी झालीच तर आपण काय शिक्षा करायची तें ठरवूं. अर्थात् येथल्या येथे त्यांना वाटेल तें पुस्तक वाचण्याची परवानगी असावी. शिवाय वाचनालयाचा अितर अुपयोगहि होअीलच. परीक्षेच्या दृष्टीने कोणतीं पुस्तकें वाचावींत आणि निव्वळ ज्ञानसंवर्धनाच्या दृष्टीने कोणतीं वाचावींत हा सल्लाहि विद्यार्थ्यांना येथे मिळाला पाहिजे. नोटिस-बोर्डाचा आपल्याला खूप अुपयोग करतां येअील. दररोज जें जें म्हणून वाचनीय साहित्य आपल्या हाताला लागेल तें विद्यार्थ्यांच्या जातां-येतां नजरेस पडेल अशी व्यवस्था करावी. ”

“ बरें, गरीब विद्यार्थ्यांसाठी काय योजना आहे ? त्यांच्यासाठी आपण अेक ‘ लोन–लायब्ररी ’ काढूं. माजी विद्यार्थ्यांकडून पुस्तकें मिळवूं. त्यांतील पाठ्य पुस्तकें मामुली आकार घेअून त्यांना वर्षभर वापरण्याची सवलत ठेवूं. कशी काय योजना वाटते तुम्हाला ? ” वाचनालयअधिकाऱ्यांना तसें म्हटलें तर सर्वच सूचना तत्त्वतः मान्य होत्या. फक्त डिपॉझिट् घेअूं नये ही गोष्ट तितकीशी त्यांना पसंत नसावी, असें दिसत होतें. विद्यार्थ्यांच्या निष्काळजीपणाच्या व बेशिस्तीच्या कथा त्यांनी मला तपशीलवार अैकविल्या. त्या अितक्या, की माझ्या विद्यार्थ्यांविषयी माझ्या मनांत अविश्वास अुत्पन्न होणार की काय असें मला वाटूं लागलें, म्हणून “ पाहूं पुढं ! ” अेवढें त्रोटक अुत्तर देअून मी तेथून बाहेर सटकलों.

ह्या प्रश्नाने मला बरेच दिवस गोंधळांत टाकलें. कॉलेज सुरू होअून आता दोन महिने लोटले होते. माझ्या बाकी सर्व कल्पना मूर्त स्वरूपांत आल्या होत्या. असमाधानकारक असें कांहीच घडलें नव्हतें. पण मध्येच अेखादा गैरप्रकार होअी व वरील प्रश्न माझ्यापुढे पुन्हा अुभा राही. अेक दिवस कोणी पालक मला भेटण्यासाठी आले. त्यांच्याशीं बोलतां बोलतां हा प्रश्न निघाला आणि माझ्या तोंडून सहज शब्द निघून गेले, की हा प्रश्न सोडविण्यांत पालकांनी हातभार लावावा. नंतर ह्या प्रश्नावरच मी विचार करूं लागलों.

त्यांतून निष्पन्न झालें तें असें. आमच्या विद्यार्थ्यांच्या पालकांपैकी जे लोक मदत करायला तयार झाले त्यांची व गावांतील कांही प्रतिष्ठित मंडळींची आम्ही अेक समिति नेमली. ज्या ज्या वेळेला विद्यार्थ्यांच्या हातून प्रमाद घडे त्या त्या वेळेला आम्ही ही गोष्ट ह्या समितीपुढे विचारार्थ मांडत असूं. ही समिति त्या त्या विद्यार्थ्यांच्या पालकांना बोलावून घेअून त्यांच्याशीं ह्या प्रश्नाची खुली चर्चा करीत असे. त्या पालकांच्या सल्ल्यानुसार ह्या विद्यार्थ्याला योग्य समज दिली जाअी, त्याचप्रमाणे त्याच्या अेकंदर वागणुकीविषयीहि त्या पालकांना समिति मार्गदर्शन करीत असे. आमच्याजवळ आम्हीं ठेवलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याच्या तपशीलवार नोंदीचा ह्या समितीस खूपच अुपयोग झाला व हें काम खूपच सोपें झालें.

अेका गहन प्रश्नाची अशा रीतीने अेक कायमची यंत्रणा निर्माण करून सोडवणूक करण्याचा माझा हेतु होता. विद्यार्थी हा समाजाचा अत्यंत संस्कारक्षम असा घटक होय. अशा नाजुक जागीं समाजाची थोडी तरी सत्ता नको का ?

आणखी कायकाय माझ्या डोक्यांत अुद्भवलें असतें कोण जाणे ! तरी बरें, माझी नेमणूक अेक वर्षापुरतीच होती. ह्या अवधींत माझें डोकें खूपच सुपीक झालें होतें. अेवढ्यासाठी तरी मी कॉलेजचा ऋणी असायला पाहिजे. पण अेवढेंच नाही; कॉलेज हा माझ्या जीवनांत अेक मोठा आधार निर्माण झाला होता. पण जगांत कोठलाच आधार शाश्वत नाही म्हणूनच की काय, मीहि कॉलेजपासून वर्षभरांत दूर जाणार होतों !

